



कोल्हापूर : संत गाडगे महाराज अध्यासनातर्फे जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्या हस्ते प्रा. डॉ. रूपा शहा यांचा सन्मान करताना.

# प्रा. डॉ. रूपा शहा यांचा सन्मान

जरगनगर, ता. २८ : संत गाडगे महाराज अध्यासनातर्फे झालेल्या कार्यक्रमात माजी नगरसेविका प्रा. डॉ. रूपा शहा यांना जिल्हाधिकारी डॉ. दौलत देसाई यांच्या हस्ते सन्मानित केले. प्रा. डॉ. शहा शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात ४० वर्षे कार्यरत आहेत. या दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांत महिलांसाठी आरक्षण जाहीर झाल्यावर प्रा. डॉ. शहा यांनी महापालिकेची निवडणूक लढवली होती. १९९० ते १९९५ कालावधीत नगरसेविका म्हणून काम करताना त्यांनी अनेक लक्षणीय, अनुकरणीय गोष्टी केल्या होत्या. संपर्क कार्यालय हा पायंडा त्यांनी सुरू केला होता.

दर आठवड्याला ठराविक वेळी प्रभागातील नागरिक, अधिकारी यांना एकत्र आणून नागरिकांच्या तक्रारी दूर करणे, केवळ प्रभागातील प्रश्नांचा अभ्यास न करता संपूर्ण शहराच्या प्रश्नांचा अभ्यास करून ते सोडविण्यासाठी काय करता येईल याविषयी सूचना करणे, भूजलसाठे शुद्ध आणि वापरात राहावेत, यासाठी प्रयत्न करणे, भास्करराव जाधव वाचनालयाच्या राजर्षी शाहू व्याख्यानमालेला लोकप्रिय बनवणे, उद्यानांचा विकास अशा बाबी त्यांच्याकडून त्या काळात झाल्या. अंबाबाई मंदिरानजीक असलेल्या संत गाडगे महाराज चौकातील संत गाडगे महाराजांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करून त्या पुतळ्यावर छत्री बसवण्याचे कामही डॉ. शहा यांनी केले होते. या कार्याची दखल घेत अध्यासनातर्फे संत गाडगे महाराज समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रा. डॉ. शहा यांना सन्मानित केले. अध्यासनाचे अध्यक्ष प्राचार्य रा. तु. भगत, माजी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कार्याध्यक्ष एस. एन. पाटील, उपाध्यक्ष संजय पाटील उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या पुनर्परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा २७ ऑक्टोबर पासून सुरू झाल्या. मात्र, या परीक्षेत काही कारणास्तव गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्परीक्षा घेतल्या जात आहेत. सोमवारी (दि. २८) एम.ए. आणि एम.बी.ए.साठी झालेल्या परीक्षा सुरळीत झाल्या. या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या एकूण सहापैकी चार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

# विद्यापीठाची उद्या अधिसभा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक बुधवार, दि. ३० डिसेंबर रोजी होत आहे. राजर्षी शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ येथे दुपारी १२ वाजता होणाऱ्या या सभेत नवीन शैक्षणिक वर्षाबाबत चर्चा होणार आहे. कोरोनानंतर येणाऱ्या विविध शैक्षणिक आव्हानांबद्दलही चर्चा होईल.